
निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २६६ वा.
रविवार :३० नोव्हेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247



# मराठी भाषेला समृद्ध करणारे साहित्यिक - डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

मराठीतील दिवंगत जेष्ठ साहित्यिक आणि प्रगल्भ विचारवंत डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचा आज स्मृतिदिन. ३० नोव्हेंबर २०२२ रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी ते आपल्या समर्थ लेखणीचा ठसा उमटवून आपल्यातून निघून गेले. त्यांच्या जाण्याने मराठी साहित्यविश्वात निर्माण झालेली पोकळी आजही तितकीच जाणवते.

**बालपण, शिक्षण आणि प्रारंभिक प्रवास**

२९ मार्च १९४८ रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड या साध्या पण संस्कारी वातावरण असलेल्या गावी त्यांचा जन्म झाला. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण त्यांनी गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत पूर्ण केले. लहानपणीच वाचनाची आवड आणि भाषेविषयीची संवेदनशीलता त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दृढ होत गेली.

१९६९ साली देगलूर येथून त्यांनी बी.ए. पदवी मिळवली. या परीक्षेत ते **मराठवाड्यात तिसरे** तर **मराठी विषयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण** झाले-हा त्यांचा साहित्यिक आयुष्याचा पहिला भक्कम टप्पा. त्यानंतर त्यांनी मराठवाडा विद्यापीठातून एम.ए. पूर्ण केले. १९८१ मध्ये **यु. म. पठाण** यांच्या मार्गदर्शनाखाली *शंकरराव पाटील यांच्या साहित्याच्या चिकित्सक अभ्यास* या विषयावर त्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली.

**अध्यापन क्षेत्रातील उल्लेखनीय कारकीर्द**

१९७१ ते १९७७ या काळात त्यांनी बीड येथील महाविद्यालयात अध्यापन केले. अध्यापक म्हणून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना केवळ शिक्षणच दिले नाही, तर साहित्यिक जाण, सामाजिक संवेदनशीलता आणि वैचारिक स्पष्टता दिली.

१९७७ मध्ये त्यांची नियुक्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात झाली. पुढे ते **पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख** झाले. २००५ ते २०१० या कालावधीत त्यांनी **डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू** म्हणून जबाबदारी निभावली. कुलगुरू म्हणून त्यांनी शिक्षण व्यवस्थेतील संशोधनाची दिशा बदलून दाखवली आणि अभ्यासक्रम अधिक सुसंगत व विद्यार्थी-केंद्रित बनवले.

**साहित्य निर्मिती : विषयवैविध्य आणि भाषिक सौंदर्य**

डॉ. कोत्तापल्ले यांनी १९७० पासून लेखनास प्रारंभ केला. त्यांच्या साहित्याचा पट अत्यंत व्यापक, सखोल आणि समाजनिष्ठ होता. त्यांनी कविता, कथा, कादंबरी, समीक्षालेखन, संपादन अशा विविध क्षेत्रांत महत्त्वपूर्ण योगदान दिले.

**कविता आणि कथा**

'मुड्स' (१९७६) हा त्यांचा पहिला कविता संग्रह. त्यांच्या कवितांमध्ये आत्मसंवाद, सामाजिक प्रश्न आणि मानवी जगण्यातील ताणतणाव यांचे मार्मिक चित्रण आढळते.

'कर्फ्यु आणि इतर कथा', 'संदर्भ' हे त्यांचे उल्लेखनीय कथासंग्रह.

'कवीच्या गोष्टी' आणि 'सावित्रीच्या लेकी' या त्यांच्या दीर्घकथा विशेष लोकप्रिय झाल्या. या कथांमध्ये स्त्रीजीवन, ग्रामीण वास्तव आणि सामाजिक न्यायाची जाणीव प्रखरपणे दिसून येते.

**कादंबऱ्या आणि अन्य साहित्य**

'गांधारीचे डोळे', 'मध्यरात्र' या त्यांच्या चर्चित कादंबऱ्या. मानवी मानसशास्त्र, सामाजिक वास्तव आणि मूल्यव्यवस्थेतील संघर्ष यांचा या कादंबऱ्यांत प्रभावी वेध घेतला आहे.

त्यांनी ललित लेखनातही उत्तम कामगिरी केली. भाषेची सहजता, आशयातील खोली आणि विचारांची परिपक्वता त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये होती.

**समीक्षालेखन**

मराठी साहित्य परीक्षण क्षेत्रातही त्यांचे कार्य दखलपात्र आहे.

'साहित्याचा अन्वयार्थ'
'आधुनिक मराठी कविता'
'नव कथाकार शंकर पाटील'
'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि बोध'

ही त्यांची समीक्षात्मक ग्रंथे आजही संशोधकांसाठी मार्गदर्शक ठरतात.

तसेच, 'निवडक बी. रघुनाथ', 'स्त्री-पुरुष तुलना' यांचे त्यांनी संपादन केले.

**संस्था, पदे आणि सामाजिक योगदान**

डॉ. कोत्तापल्ले यांनी अनेक महत्त्वाच्या शैक्षणिक व साहित्यिक संस्थांचे अध्यक्षपद भूषवले-

* नॅक
* राज्य मराठी विकास संस्था
* साहित्य अकादमी
* राज्य ग्रंथ पुरस्कार समिती
* बाल पुरस्कार समिती
* एच.एस.सी. बोर्डाचे मराठी अभ्यास मंडळ

त्यांनी मराठी साहित्य परिषद`तही कार्यवाहक म्हणून काम केले. अनेक नियतकालिकांमध्ये संपादक म्हणून सक्रिय सहभाग घेतला.

२०१२ साली चिपळूण येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले-मराठी साहित्य क्षेत्रातील हा सर्वोच्च सन्मान मानला जातो.

शेवटची वाटचाल आणि सदैव स्मरणात राहणारे वारस

जवळपास पाच दशके त्यांनी मराठी भाषेला आपले सर्वस्व अर्पण केले. अत्यंत संवेदनशील, जागरूक आणि जडणघडणीचा आवाज असलेल्या त्यांच्या साहित्याने मराठी भाषेला एक वेगळी दिशा दिली.

३० नोव्हेंबर २०२२ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या जाण्याने मराठी विषयाची आणि मराठी साहित्यविश्वाची **अपरिमित हानी** झाली. त्यांच्या लेखणीची ताकद, भाषेची सौंदर्यपूर्ण जाण आणि विषयातील प्रगल्भता मराठी वाचकांच्या मनात सदैव कायम राहील.

**स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन**

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या स्मृतिदिनी

मराठी साहित्यविश्वातील या विद्वान दीपस्तंभास विनम्र अभिवादन!

त्यांनी घडवलेली साहित्यसंपदा पुढील पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील.

# किती उमेदवारांकडे आहेत विकासाचे नवे मुद्दे ?

**आत्ताच एक्सप्रेस धर्माबाद प्रतिनिधी/ गंगाप्रसाद सोनकांबळे/** धर्माबाद नगर परिषदेअंतर्गत तब्बल ९ वर्षानंतर सदस्य आणि नगराध्यक्ष पदासाठी निवडणुका होत आहेत.२०२१ मध्ये कोरोना काळात नगरपालिकेचा कार्यकाळ संपून आजतागायत म्हणजे चार वर्षे पालिकेवर प्रशासक राज होते. एवढ्या प्रदीर्घ कालावधीनंतर जनतेला आपले प्रतिनिधी निवडून देण्याची संधी आलेली असताना किती उमेदवार प्रबळ,सक्षम विकासाचे मुद्दे घेऊन जनतेसमोर जात आहेत हा चिंतनाचा विषय बनला आहे. प्रत्येक प्रभागात साधारण पाच-सहा उमेदवार निवडणूकिच्या रिंगणात उतरले आहेत. काही मोजके उमेदवार सोडले तर रस्ते,नाल्या,पाणी याशिवाय कुणाकडेही नवीन विकासाचे मुद्दे दिसत नाहीत. स्वातंत्र्याच्या सत्तर - पंच्याहत्तरी नंतर सुद्धा केवळ प्राथमिक सुविधांनाच अजूनही विकासकामे म्हणून संबोधणे म्हणजे खूप मोठी शोकांतिका आहे. याव्यतिरिक काही ठिकाणी स्मशानभूमीचा एक प्रलंबित मुद्दा अनेकांकडे विकासकामांच्या यादीत पडून आहे. मत मागायला येणाऱ्या किती उमेदवारांनी विकासकामांचा जाहीरनामा प्रसिद्ध केला हेच अजून कोणाला माहीत नाही.

रोजगाराअभावी अनेक मतदार आज मेट्रो सिटी, औद्योगिक वसाहत असलेल्या शहरात कामानिमित्त वास्तव्यास आहेत. आज त्याच मतदारांवर आपली लीड वाढवता येईल का याची चाचपणी उमेदवार करत आहेत. मात्र रोजगाराच्या संधी आपल्या परिसरात उपलब्ध करून घेण्यासंदर्भात प्रयत्न करण्यास कुणी तयार नाही. काही ठिकाणी तर मोठ्या पक्षांनी सुद्धा कमी शिकलेले उमेदवार दिले आहेत. शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यास त्यांचा काय हातभार लागेल हा विचार न केलेलाच बरा. प्रत्येक उमेदवार विरोधी पक्षांवर विकासाच्या बाबतीत आरोपांच्या फैरी झाडत आहेत मात्र रस्ते,नाली,पाणी याखेरीज मुद्देच बहुसंख्य उमेदवारांकडे नसल्याचे दिसते.



# युवा महोत्सवात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ ठरले अव्वल!

**युवा महोत्सवात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने उमटवली विजयी मोहर**
**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावत मिळवला पहिला क्रमांक**



**आत्ताच एक्सप्रेस छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** असोशिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजच्या ३९ व्या सेंट्रल झोन युवा महोत्सवामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने अव्वल क्रमांक मिळवत जेतेपद पटकावले. एमजीएम विद्यापीठात दिनांक २५ ते २९ नोव्हेंबर २०२५ या दरम्यान आयोजित या युवा महोत्सवामध्ये सर्वाधिक १९ पारितोषिके जिंकत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने विजयी मोहर उमटवली. विजेत्या संघाला राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त सिने अभिनेते उपेंद्र लिमये यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, पदक आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. जेएनईसी लॉन्स, एमजीएम विद्यापीठ येथे असोशिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज ३९ व्या आंतर विद्यापिठीय सेंट्रल झोन युवा महोत्सवाच्या बक्षीस वितरण समारंभ मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी, सिने अभिनेते उपेंद्र लिमये, एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, एआययु'च्या अपर सचिव डॉ.ममता राणी अग्रवाल, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, एआययु अधिकारी डॉ.निर्मल जौरा, दीपक कुमार झा, महोत्सवाचे सचिव डॉ.शिव कदम व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

पाच दिवस चाललेल्या ३९ व्या आंतरविद्यापिठीय सेंट्रल झोन युवा महोत्सवात मध्यप्रदेश, छत्तीसगडसह मराठवाडा आणि विदर्भातील २३ विद्यापीठातील ११०८ विद्यार्थी - विद्यार्थिनी आपला सहभाग नोंदवला होता. म्युझिक (९), डान्स (३), लिटररी (५), थेटर (४) आणि फाईन आर्ट्स (६) अशा एकूण मुख्य ५ कलाप्रकारांत विविध २७ प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्यातील ७ विद्यापीठे, मध्यप्रदेश राज्यातील १३ विद्यापीठे आणि छत्तीसगड राज्यातील ३ विद्यापीठे असे एकूण २३ विद्यापीठांचा यामध्ये सहभाग होता. एकूण सत्तावीस स्पर्धांमधील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या अशा एकूण ८१ स्पर्धकांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. तसेच यावेळी, या युवा महोत्सवात सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

**युवा महोत्सव एकूणच विजेतेपदाचा निकाल , सर्वसाधारण विजेतेपद,**

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, महाराष्ट्र, सर्वसाधारण उपविजेता संघ १ , देवी अहिल्या विश्वविद्यालय, इंदोर, मध्य प्रदेश, सर्वसाधारण उपविजेता संघ २**

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर, महाराष्ट्र, सर्वसाधारण उपविजेता संघ ३**

**इंदिरा कला संगीत विश्वविद्यालय, खैरागढ, छत्तीसगड, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, महाराष्ट्र, सर्वसाधारण उपविजेता संघ ४, जिवाजी विद्यापीठ, ग्वाल्हेर, मध्य प्रदेश**

# कर्जवसुलीस एक वर्षाची स्थगिती का? सरळ कर्जमाफी का नाही?

हा प्रश्न आज राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याच्या मनात खा`लवर घर करून बसलेला आहे. कारण परिस्थितीच इतकी बिकट आहे की केवळ कर्जवसुली स्थगितीने शेतकऱ्यांच्या जखमेवर मलम लागणे तर दूरच, उलट यातून सरकारने मोठा निर्णय टाळल्याचे चित्र अधिक स्पष्ट होते.

**१) नैसर्गिक आपत्तींचा जबरदस्त फटका - शेतकरी पूर्णपणे कोसळलेला**

या वर्षी जून ते सप्टेंबर या कालावधीत महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये अतिवृष्टी, ढगफुटी, पूर, पिकांची वाफारे पडणे, घरांची पडझड, जनावरांचे मृत्यू, तसेच काही भागांत गंभीर जिवीतहानी असे एकामागून एक संकटांचे सावट राज्यावर पसरले.

आजच्या परिस्थितीत शेतकऱ्यांचे:

* हंगामाचे उत्पन्न घसरले
* कर्ज फेडीची क्षमता संपली
* नवीन हंगामाचे भांडवली खर्च करणे कठीण झाले
* कुटुंब चालवण्यासाठीसुद्धा पैसे नाहीत

अशा परिस्थितीत कर्जवसुली थांबविणे म्हणजे फक्त वेळकाढूपणा , कारण अडचण तर कायम आहे.

**२) सरकारची आश्वासने आणि वास्तव-विरोधाभास स्पष्ट**

निवडणुकीपूर्वी सरकारने जाहीरनामा प्रसिद्ध करताना:

* संपूर्ण कर्जमाफी
* सातबारा कोरा
* शेतकऱ्यांसाठी विशेष सवलती

अशी आश्वासने दिली होती.

पण प्रत्यक्षात:

* लाडकी बहिण योजनेला निधी सहज उपलब्ध
* इतर राजकीय आकर्षक योजना तातडीने लागू
* पण शेतकऱ्यांच्या मूलभूत मागण्यांवर वेळकाढू धोरण

हे पाहून शेतकरीच नव्हे तर संपूर्ण ग्रामीण समाज प्रश्न विचारतो-

कर्जमाफी निवडणुकीपूर्वीच का आठवते? संकटाच्या वेळी नाही?

**३) कर्जवसुली स्थगिती-उपाय नव्हे, केवळ मुद्द्याला पुढे ढकलणे**

शेतकरी कर्ज फेडणार कसा? उत्पन्नच नाही, तर पुढच्या वर्षी कर्जवसुली दुप्पट दडपणानेच येणार.

**स्थगिती म्हणजे:**

* मूळ कर्ज तसेच राहणार
* व्याज चालूच
* शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती आणखी बिकट

यातून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसल्यासारखेच झाले.

**४) शेतकरी चौफेर घेरला - निसर्ग, राजकारण आणि हिंसक वन्यजीव**

आज शेतकऱ्यांची परिस्थिती हिरमोड करणारी आहे:

**निसर्गाची अस्थिरता:**

* पाऊस कधी जास्त, कधी अजिबात नाही
* कधी गारपिटीचा तडाखा
* कधी पिकात किडीचा प्रादुर्भाव

**राजकीय उदासीनता:**

* हमीभाव मिळत नाही
* उत्पन्न खर्चापेक्षा कमी
* वीज, बियाणे, खतांचे दर आकाशाला भिडले

**हिंसक वन्यप्राणी:**

जंगलतोड व वाढते शहरीकरण यामुळे वाघ, बिबटे, अस्वल यांचे गावकुसापर्यंत आगमन वाढले.

* शेतातील कष्टाने पिकवलेले पीक उद्ध्वस्त
* जनावरे मृत
* जिवीतहानीची भीती कायम

निसर्गाचा धोका + आर्थिक ताण + शासनाकडून आश्वासने अपूर्ण

हे तिघे मिळून शेतकऱ्याला मानसिकदृष्ट्या कोसळू देतात.

५) खरी गरज - कर्जमाफी नव्हे, तर शेतकऱ्याला सक्षम करण्याची पायाभूत व्यवस्था

**जर सरकारने:**

* शेतमालाला योग्य हमीभाव दिला
* बी-बियाणे, खते, वीज स्वस्त केली
* नैसर्गिक आपत्तीबाबत जलद आणि मोठी मदत दिली
* तंत्रज्ञान, सिंचन सुविधा, बाजारपेठ जोडणी मजबूत केली

तर शेतकऱ्याला कर्ज घ्यावेच लागणार नाही. शेतकरी *उत्पादक* होईल, *उपकारभोगी* नाही.

**निष्कर्ष:** आज शेतकरी आर्थिकदृष्ट्या तुटलेला, मानसिकदृष्ट्या खचलेला आणि शासनाच्या आश्वासनांवर अवलंबून राहिल्याने असुरक्षित झालेला आहे.

कर्जवसुली स्थगिती हा केवळ तात्पुरता दिलासा.

खरा उपाय म्हणजे कर्जमाफीसह दीर्घकालीन कृषी सुधारणा , ज्या शेतकऱ्याला सक्षम बनवतील, आत्मनिर्भर करतील आणि संकटात आधार देतील.

**जय जवान, जय किसान, जय हिंद**

**- रमेश कृष्णराव लांजेवारें स्वतंत्र पत्रकार, नागपूर**

# मराठवाड्यातील नामांकित प्राचार्यांच्या यादीत नाव राहील असे प्राचार्य डॉ. तेजनकर यांचे कार्य - श्री.त्रिंबकराव पाथ्रीकर



**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** दिनांक : २९ नोव्हेंबर २०२५ मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक तेजनकर यांचा सेवागौरव समारंभ शनिवारी (दि.२९) रोजी आयोजित करण्यात आला. डॉ. अशोक तेजनकर हे गेल्या ३६ वर्षापासून अध्यापन, संशोधन क्षेत्रात कार्यरत आहेत. १९९० पासून देवगिरी महाविद्यालयात प्राध्यापक तर सहा वर्षांपासून प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. तर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात २७ फेब्रुवारी २०१८ ते ३ जून २०१९ या काळात प्रकुलगुरू म्हणून कार्य केले. तसेच महाविद्यालयात विभागप्रमुख, भूगर्भशास्त्र अभ्यास मंडळ अध्यक्ष, अधिसभा, विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून कार्य केले आहे. तसेच बामुक्टो संघटनेत सक्रिय कार्य केले आहे. महाविद्यालयाच्या सेवेतून ते ३० नोव्हेंबर रोजी निवृत्त होत आहेत. या निमित्त सुरवातीला मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस मा.आ. सतीश चव्हाण यांनी त्यांचा सत्कार केला.

त्यानंतर सेवागौरव कार्यक्रमामध्ये म.शि.प्र. मंडळ केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्री.त्रिबकराव पाथ्रीकर यांच्या हस्ते सपत्नीक गौरव करण्यात आला. याप्रसंगी म. शि प्र मंडळाचे उपाध्यक्ष श्री. सलीम शेख तसेच केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्री. विवेक भोसले, डॉ. प्रकाश भांडवलदार, महाविद्यालय विकास समिती सदस्य डॉ.आदित्य येळीकर, निमंत्रित सदस्य श्री.विवेक जैस्वाल, म. शि प्र मंडळाचे जेष्ठ सदस्य श्री.द्वारकादास पाथ्रीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री.त्रिंबकराव पाथ्रीकर होते. याप्रसंगी श्री.विवेक भोसले, श्री.द्वारकादास पाथ्रीकर आदी मान्यवरांनी प्राचार्य अशोक तेजनकर यांच्या प्रशासकीय कारकिर्दीबद्दल गौरवोद्गार काढले. प्राचार्य तेजनकर यांनी विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासंबंधी रोजगार पूरक विद्यार्थी निर्माण करण्यासंबंधी अनेक उपक्रम महाविद्यालयात राबवले. त्यांच्या कार्यकाळात गरजाभिमूख अभ्यासक्रम त्यांनी सुरु केले. द्वारकादास पाथ्रीकर यांनी प्राचार्य तेजनकर यांच्या मितभाषी प्रशासन कौशल्यावर भाष्य केले.

आपल्या अध्यक्ष समारोपमध्ये बोलताना श्री.त्रिंबकराव पाथ्रीकर यांनी प्राचार्य तेजनकर यांच्या कार्यकाळात नॅक -++ ग्रेड संपादन केला.

डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ कार्यक्षेत्रामधील देवगिरी महाविद्यालय हे पारंपारिक अभ्यासक्रम राबवणारे पाहिले स्वायत्त महाविद्यालय ठरले. तसेच अनेक व्यावसायिक अभ्यास क्रम सुरु करण्यात आले प्राचार्य तेजनकर यांनी प्राचार्य गंगाधरराव पाथ्रीकर, प्राचार्य चिखलीकर, प्राचार्य ना.य.डोळे यांची कार्य परंपरा पुढे चालवली असे मत त्यांनी व्यक्त केले.

आपल्या सेवागौरव निमित्त सत्कार प्रसंगी मनोगत व्यक्त करताना प्राचार्य अशोक तेजनकर असे म्हणाले त्यांच्या शैक्षणिक, प्रशासकीय आणि संशोधन कामगिरी मध्ये मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ कार्यकारिणी यांची भूमिका महत्वाची आहे.

म. शि. प्र. मंडळाचे सरचिटणीस मा.आ. सतीश चव्हाण आणि महाविद्यालय विकास समितीचे ज्येष्ठ सदस्य श्री. पंडितराव हर्षे यांनी दाखवलेल्या विश्वासामुळे आणि त्यांच्या पाठबळामुळे मला देवगिरी महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणून भरीव कामगिरी करण्याची संधी मिळाली.व महाविद्यालयास नॅक चा -++ दर्जा, स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा आणि व्यवसायिक कोर्सेस सुरु करता आले.

ग्रामीण भागातील विद्यार्थी म्हणून सुरु झालेला प्रवास विद्यापीठाच्या प्रकुलगुरू पदापर्यंत येऊन पोहचला ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. यावेळी ज्येष्ठ विधिज्ञ ड. ऐ.आर. शेळके, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रवी पाटील, डॉ. अपर्णा तावरे, डॉ. गणेश मोहिते, डॉ.अरुण काटे आणि डॉ.शिवानंद भानुसे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक प्रशासकीय कर्मचारी तसेच शहरातील मान्यवरांची उपस्थिती होती. त्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार डॉ. सुलक्षणा जाधव यांनी केले.

## संक्षिप्त

# कर्णकर्कश भोंग्याने फुलंब्रीकर वैतागले

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री तालुका प्रतिनिधी /सरफराज पटेल/** फुलंब्री नगरपंचायत निवडणुकीस केवळ काहीच दिवस उरले असून मतदान २ डिसेंबर रोजी होणार आहे. त्यामुळे संपूर्ण शहरात राजकीय वातावरण ताप-ले असून प्रचाराची रणधुमाळी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. ५४ उमेदवारांकडून तब्बल ४० हून अधिक प्रचारगाड्या दिवसभर फिरत असल्याने त्यावरील भल्या-मोठ्या भोंग्यांचा कर्णकर्कश आवाज नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. ध्वनीप्रदूषणाबाबतचे नियम काटेकोरपणे पाळले जात नाहीत, त्यामुळे *निवडणूक आयोगाने घालून दिलेली डिसीबल मर्यादा कोण अंमलात आणणार?* असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे.

**शाळा, हॉस्पिटल परिसरात त्रास**

शहरातील मुख्य बाजारपेठ, अरुंद गल्ल्या, शाळा व महाविद्यालयांच्या परिसरातून जवळून जाणाऱ्या प्रचारगाड्यांमुळे विद्यार्थी व पालक त्रस्त झाले आहेत. बोर्ड परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे एकाग्रता विचलित होत असल्याच्या तक्रारी अनेक पालकांनी प्रशासनाकडे नोंदवल्या आहेत. हॉस्पिटलजवळून जोरजोरात गाणे, घोषणा आणि डिजिटल स्क्रीनवरील जाहिरातींमुळे रुग्ण व त्यांचे नातेवाईकही त्रस्त झाले आहेत.

शांतता क्षेत्रात ध्वनीवर्धक यंत्रांवर प्रतिबंध असूनही काही प्रचारपथकांकडून नियमांचे उघड उल्लंघन केले जात असल्याचे पाहायला मिळत आहे.

**वाहतूक कोंडीचा मोठा प्रश्न**

मोठे स्पिकर, डिजिटल स्क्रिन, बॅनर व झेंड्यांनी सजवलेल्या प्रचारगाड्या अरुंद रस्त्यांवर थांबत असल्याने वाहतूक कोंडी वाढत आहे. काही ठिकाणी रस्ते पूर्णपणे जाम होत असून नागरिकांना कामावर जाण्यास, विद्यार्थ्यांना शाळेत पोहोचण्यास विलंब होत आहे. गाड्यांच्या रांगांमुळे व्यापाऱ्यांनाही अडचणी निर्माण झाल्या आहेत. काही ठिकाणी प्रचारगाड्यांच्या आवाजावरून वादही झाले असून पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला आहे.

**ध्वनीमर्यादांचे उल्लंघन**

निवडणूक आयोगाने ध्वनीवर्धकाच्या वापरासाठी वेळ, मर्यादित ध्वनीस्तर आणि संवेदनशील ठिकाणांसाठी विशेष नियम लागू केले आहेत. मात्र काही उमेदवार ही मर्यादा पाळताना दिसत नाहीत. रात्री उशिरापर्यंत सुरू असणाऱ्या ढोल-ताशा पथकांमुळे वाजविण्यात येणाऱ्या भोंग्यांमुळे नागरिक झोपेपासूनही वंचित राहत आहेत. *प्रशासनाने कडक कारवाई करावी*, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

**निवडणूक रंगत वाढली**

२०१७ नंतर दुसऱ्यांदा फुलंब्री नगरपंचायतची निवडणूक होत असून यावेळी नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडला जाणार आहे. नगराध्यक्ष पदासाठी तिघे उमेदवार रिंगणात आहेत.

भाजपाचे सुहास शिरसाट

उध्दव बाळासाहेब ठाकरे सेनेचे राजेंद्र ठोंबरे

राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांचा एक उमेदवार

नगरसेवकांच्या १७ जागांसाठी ५४ उमेदवारांनी अर्ज दाखल केले असून बहुतेक प्रभागांत मुकाबला दोन ते तीन उमेदवारांतच होणार आहे. भाजपाने १७ पैकी १५ जागांवर उमेदवार उभे केले असून दोन जागा राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांना सोडल्या आहेत. उबाठा सेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी एकत्रितपणे निवडणूक रिंगणात असून उबाठा सेनेला ११, काँग्रेसला ४ जागा देण्यात आल्या आहेत.

**मतदारसंख्या व राजकीय गणित**

फुलंब्री नगरपंचायत निवडणुकीत एकूण १७,६३० मतदार आहेत.

**पुरुष : ९,१९६**
**महिला : ८,४३३**

काही प्रभाग वगळता बहुतांश ठिकाणी सरळ द्विपक्षीय लढत आहे. शिवसेना शिंदे गटाच्या काही उमेदवारांनी माघार घेऊन भाजपात प्रवेश केल्याने स्थानिक राजकीय समिकरणांमध्ये मोठा बदल झाला आहे. त्यामुळे यंदाची निवडणूक अधिक चुरशीची होण्याची दाट शक्यता आहे.

**नागरिकांची प्रशासनाकडे अपेक्षा**

सततच्या आवाजाने त्रस्त झालेल्या नागरिकांकडून प्रशासनाने ध्वनीप्रदूषणावर तातडीने नियंत्रण आणावे, प्रचारगाड्यांच्या मार्गांचे नियोजन करावे आणि शांतता क्षेत्रातील नियमांचा कठोर अंमल करावा, अशी मागणी केली जात आहे.

आगामी काही दिवसांत प्रचारकमालीचा शिगेला पोहोचणार असल्याने फुलंब्रीतील शांतता आणि शिस्त कशी राखली जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बिडकीन पोलिसांची कार्यशीलता: ८ गहाळ मोबाईल मूळ मालकांच्या स्वाधीन

**आत्ताच एक्सप्रेस**

**बिडकीन प्रतिनिधी/** बिडकीन पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांचे गहाळ (हरवलेले) मोबाईल शोधून काढण्यात बिडकीन पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. मागील काही महिन्यांपासून मोबाईल हरवल्याच्या वाढत्या तक्रारींना गांभीर्याने घेत, पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण, सायबर सेलचे सहकार्य आणि सततच्या शोधमोहीमेच्या मदतीने एकूण १ लाख ५ हजार रुपये किमतीचे ८ मोबाईल शोधून काढले . हे सर्व मोबाईल आज मूळ मालकांना सन्मानपूर्वक परत करण्यात आले.

**तक्रारी वाढल्या, पोलिसांची चोख भूमिका**

गेल्या काही दिवसांत बिडकीन पोलीस ठाण्यात गहाळ मोबाईलविषयी मोठ्या प्रमाणात तक्रारी दाखल झाल्या होत्या. मोबाईल फोन हे आजच्या काळात केवळ संवादाचे साधन नसून बँकिंग, शिक्षण, व्यवसाय, नोकरी, तसेच वैयक्तिक माहिती साठवण्याचे माध्यम बनले आहे. त्यामुळे मोबाईल हरवणे म्हणजे केवळ आर्थिक नुकसान नाही, तर अनेक महत्त्वपूर्ण माहितीचा धोकाही वाढतो.

ही परिस्थिती ओळखून बिडकीन पोलिसांनी प्रत्येक तक्रारीची संपूर्ण गंभीरतेने दखल घेतली. तांत्रिक पद्धतींचा वापर, खचएख लोकेशन ट्रॅकिंग आणि सायबर सेलची मदत यातून हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू झाले.

**सायबर सेलची मदत आणि तांत्रिक विश्लेषण**

पोलिसांनी सर्व गहाळ मोबाईलची खचएख नंबरद्वारे लोकेशन ट्रेस केली. मोबाईल कोणत्या ठिकाणी ऑन झाले, कोणत्या नेटवर्कचा वापर झाला, सिमकार्ड बदलले का यासारख्या तांत्रिक बाबींचे सखोल विश्लेषण करण्यात आले. अनेक ठिकाणी स्वतंत्र पथके पाठवून, चौकशी करून मोबाईल हस्तगत करण्यात आले.

या पूर्ण कार्यवाहीत सॅमसंग, विवो, ओप्पो यांसारख्या नामांकित कंपन्यांचे मोबाईल होते. काही मोबाईल इतर तालुक्यांत व जिल्ह्यांत सापडले, तर काही चोरट्यांनी विक्रीसाठी प्रयत्न केले होते. कोणत्याही अडथळ्याला न घाबरता पोलिसांनी सर्व मोबाईल मूळ मालकांपर्यंत पोहोचवले.

हरवलेले मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी बिडकीन पोलिसांचे मनापासून कौतुक केले. अनेक नागरिकांनी पोलिस स्टेशनमध्ये उपस्थित राहून आपला आनंद व्यक्त केला.

**ही कामगिरी खालील अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली**

ही यशस्वी कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झाली.

त्यांच्या सूचनेनुसार व देखरेखीखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांनी स्वतः देखरेख करून संपूर्ण तपास पद्धतीशील रीतीने पुढे नेला.

पोलीस अंमलदार आगलावे यांनी प्रत्यक्ष क्षेत्रावर जाऊन महत्त्वपूर्ण माहिती गोळा करण्यापासून ते मोबाईल हस्तगत करण्यापर्यंतची जबाबदारी अत्यंत दक्षतेने पार पाडली.

या तिघांच्या समन्वयातून आणि संपूर्ण पोलिस पथकाच्या संयुक्त प्रयत्नातून ही उल्लेखनीय कामगिरी शक्य झाली.

**नागरिकांना महत्त्वाचे आवाहन**

हरवलेला मोबाईल सापडण्याची शक्यता अधिक राहण्यासाठी नागरिकांनी तात्काळ योग्य पावले उचलणे आवश्यक आहे. यासाठी–

मोबाईल गहाळ झाल्यास त्वरित पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी. तसेच शासनाच्या CEIR (Central Equipment Identity Register) या अधिकृत पोर्टलवर ऑनलाईन तक्रार नोंदवता येते.




CEIR पोर्टलवर तक्रार नोंदवल्यानंतर मोबाईल ब्लॉक करण्याची सुविधा उपलब्ध आहे, ज्यामुळे मोबाईल गैरवापर होण्याचा धोका कमी होतो.

सिमकार्ड बदलले तरी खचएख नंबरच्या आधारे पोलिसांना लोकेशन ट्रेस करता येते, म्हणून तक्रार लवकर दाखल करणे अत्यंत महत्त्वाचे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. शेळके यांनी नागरिकांना तांत्रिक साधनसामग्रीचा योग्य उपयोग करून पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

बिडकीन पोलिसांची ही कामगिरी नागरिकांचा विश्वास आणि सुरक्षितता जपणारी आहे. गहाळ मोबाईल शोधून देण्याची ही सेवा लोकाभिमुख व परिणामकारक ठरली असून, नागरिकांकडून याला मोठा प्रतिसाद मिळत आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे शहरात प्रचार रॅली,आमदार सना मलिक यांची सभा

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद प्रतिनिधी** /खुलताबाद - येथील नगरपरिषदेचे निवडणूक प्रचार शिगेला पोहचला असून शनिवारी (दि .२९) राष्ट्रवादी काँग्रेसने जोरदार शक्ती प्रदर्शन करीत शहरातून प्रचार फेरी काढली, जुना बस स्टॅन्ड पासून निघालेली प्रचार रॅली शहरातून फिरून फर्श मोहल्ल्यात पोहचली,या ठिकाणी आयोजित प्रचार सभेला आमदार सना मलिक यांनी संबोधित केले. यावेळी बोलतांना आमदार सना मलिक यांनी आमचा पक्ष फुले शाहू आंबेडकर यांच्या विचार धारेला मानतो,माझ्या सारख्या मुस्लिम महिलेला केवळ राष्ट्रवादी काँग्रेसने आमदारकी पर्यंत पोहचविले,राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक समाजावर अन्याय होवू देणार नाही,महायुती सोबत राजकीय सलोखा आहे,मात्र राष्ट्रवादी कांग्रेसची विचारधारा आपली स्वतंत्र आहे.या सभेत पदवीधर आमदार सतीश चव्हाण यांनी मार्गदर्शन करतांना पक्षाच्या नगराध्यक्षा सह सर्व उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन केले. यावेळी

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार हाजी अकबर बेग.जगन्नाथ खोसरे, महेश उबाळे, अनुराग शिंदे,माजी नगराध्यक्ष ॲड. कैसरोद्दीन, एस.एम.कमर, मुनिबोद्दीन. तालुकाध्यक्ष सुरेश जाधव, अब्दुल अजीज. शहराध्यक्ष गजानन फुलारे, अरूण तंबारे, अयाज बेग, अनिस जहागीरदार, विपीन बारगळ,कैलास बारगळ, यांचे सह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.






# नगर परिषद निवडणुकी निमित्य कन्नड पोलीस दलाचे निघाले धडकीभरो पथसंचलन...

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड प्रतिनिधी/ उदय कुलकर्णी**/कन्नड न.परिषदेच्या निवडणुकी दरम्यान शहरातील कायदा सुव्यवस्थेस कुठेही गालबोट लागू नये व निवडणूक निर्भयतेने पार पडावी,या साठी कन्नड पोलीस दलाचे वतीने शहरात धडकीभरो पथसंचलण(रूट मार्च )करण्यात आला. सदर पथसंचलन ( रूट मार्च )हे शहरातील पोलीस दल कार्यालया पासून सुरु होऊन तहसील कार्यालयाचे मुख्य रस्त्यावरून पुढे महावीर चौक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा,स्वातंत्रवीर लोकमान्य टिळक पुतळा मार्गे पिशोर नाका, सिल्लोड रोड, भारतीय दुरसंचार कार्यालय, करीमनगर,संत रविदासनगर, वडारवाडा, शनी मंदिर, बाबा सिद्दीकी चौक व पुनःच पोलीस दल कार्यालय पर्यंत काढण्यात आला.




या काढण्यात आलेल्या पथसंचलनात ( रूट मार्च) मधे कन्नडचे उप विभागीय अधिकारी श्री.संतोष गोरड,कन्नड पोलीस दलाच्या कर्तव्यदक्ष उपविभागीय अधिकारी श्रीमती. अपराजीता अग्निहोत्री, शहर पोलीस दल कार्यालयाचे सर्वे सर्वा पोलीस निरीक्षक आर. बी. सानप, ग्रामीण पोलीस दलाचे सर्वेसर्वा सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ. रामचंद्र पवार, शहर पोलीस दलाचे पोलीस उपनिरीक्षक कुणाल सूर्यवंशी, उपनिरीक्षक चांद मेंडके, हेड कॉन्स्टेबल कैलास निभोंरकर,पोलीस दलाचे, संजय आटोळे, कैलास करवंदे, मोईस बेग, या सह दंगल नियंत्रक पथक दल,शहर व ग्रामीण पोलीस दल कार्यालयाचे जवान, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने या धडकीभरो पथसंचलणारत ( रूट मार्च ) मधे

सहभागी झाले होते.या शहरात निघालेल्या पथ संचलणाने संपूर्ण कन्नड वासियांचे लक्ष वेधून घेतले होते.

# पालकमंत्री शिरसाठ यांची जनशांती धर्म सोहळ्याला उपस्थिती



**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद प्रतिनिधी/** खुलताबाद तालुक्यातील वेरुळ खुलताबाद येथे संत जनार्दन स्वामी यांच्या २६ व्या पुण्यस्मरणा निमित्त आयोजित ॐ जगद्गुरु जनशांती धर्म सोहळ्याला शनिवारी (दि.२९) पालकमंत्री संजय शिरसाठ यांनी भेट देवुन संत जनार्दन स्वामी यांच्या पादुकांचे दर्शन घेतले, यावेळी महामंडलेश्वर शांतिगिरी महाराज यांचेही आशीर्वाद घेतले. यावेळी सोहळा समन्वयक राजेंद्र पवार, माजी महापौर नंदकुमार घोडिले यांची उपस्थिती होती.

# सिल्लोड तालुक्यातील भराडी येथील ज्ञानविकास विद्यालयात ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी / सुनील निकम**/ भराडी (ता. सिल्लोड) येथील ज्ञानविकास विद्यालयात ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन अत्यंत उत्साहात पार पडले. विज्ञान, नवकल्पना, तांत्रिक प्रगती या सर्वांचा संगम या प्रदर्शनात पाहायला मिळाला. *मुले नेहमी 'का? कसे? किती?' असे प्रश्न विचारतात, त्यांचा हा स्वभावच विज्ञानाची दिशा ठरवतो* असे मत गटशिक्षणाधिकारी **श्री. रमेशजी ठाकूर** यांनी व्यक्त केले.

ते पुढे म्हणाले, *तंत्रज्ञानाने जीवन सोपे केले असले तरी त्याचा अतिरेक घातक ठरू शकतो. प्रत्येक समस्येचे निराकरण तंत्रज्ञानाच्या योग्य वापरातूनच होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणे आणि त्यांची कल्पकता विकसित करणे ही अशा स्पर्धांची खरी उद्दिष्टे आहेत.*

**कार्यक्रमाची सुरुवात**

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले, महामानव, तसेच विज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य शास्त्रज्ञांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली. महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या समाजप्रबोधनाच्या कार्याची प्रेरणा विद्यार्थ्यांनी स्मरण केली.

**विज्ञान प्रदर्शनातील सहभाग आणि वैशिष्ट्ये**

या वर्षीच्या स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला–

प्राथमिक विभागातून – ३३ प्रयोग

माध्यमिक विभागातून – २७ प्रयोग

दिव्यांग गट – प्राथमिक १ व माध्यमिक २ प्रयोग

शिक्षक वर्ग – विज्ञान व गणित विषयातील ३ मॉडेल्स

शिक्षण विस्तार अधिकारी श्री. राजू फुसे म्हणाले, *विद्यार्थ्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होत असतात. प्रयोग करणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच त्याचे आकर्षक आणि वैज्ञानिक पद्धतीने सादरीकरण करणे महत्त्वाचे आहे.

**शैक्षणिक प्रमुखांचे विचार**

शैक्षणिक संस्थेचे प्रमुख अशोकदादा गरुड यांनी शेवटी भाषण करताना सांगितले, आजचे हे बालवैज्ञानिक उद्याचे अभियंते, वैज्ञानिक, संशोधक बनतील. राष्ट्राचे भविष्य त्यांच्या हातात आहे. त्यांनी सर्व सहभागी विद्यार्थी, शिक्षक आणि आयोजनकर्त्यांचे मनःपूर्वक कौतुक केले.

निकाल जाहीर – ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन

**प्राथमिक विभाग**

प्रथम : समाधान सर्जेराव शिंदे
उदयोन्मुख तंत्रज्ञान – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिंदेफळ
द्वितीय : अनुष्का मंगलसिंग मरमेट
हायड्रोपोनिक फार्मिंग – होलीफेथ इंग्लिश स्कूल, भराडी




तृतीय : राज अमोल रगडे
शाश्वत तंत्रज्ञान – नगरपरिषद प्रशाला, सिल्लोड
दिव्यांग गट प्राथमिक : तासिफ अमजद पठाण
विषय – *गणितीय मॉडेल*, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, भराडी

**माध्यमिक विभाग**

प्रथम : कुणाल भगवान भोरकडे
उदयोन्मुख तंत्रज्ञान – जिल्हा परिषद प्रशाला, उंडणगाव
द्वितीय : प्रीती संदीप बनकर
शाश्वत शेती – सहकार महर्षी माणिकराव पालोदकर विद्यालय, पालोद
तृतीय : श्रद्धा बबन शेजुळ
आपत्ती व्यवस्थापन – ज्ञानविकास माध्यमिक विद्यालय, भराडी
दिव्यांग माध्यमिक : सागर काकासाहेब महाकाळ
विषय – कचरा व्यवस्थापन , ज्ञानविकास माध्यमिक विद्यालय, भराडी

शैक्षणिक साहित्य विभाग
प्राथमिक : श्रीमती बागवान जेबा शब्बीर
गणितीय मॉडेल – नगरपरिषद प्राथमिक शाळा, सिल्लोड
माध्यमिक : श्रीमती विद्या भगवान सुतार इयत्ता ९वी–१०वी
विज्ञान मॉडेल – मुर्डेश्वर हायस्कूल, लिहाखेडी

प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी कष्ट करणारे कार्यकर्ते प्रकाश शिंदे, श्री. शिमरे, मथाजी काकडे, ढोरमारे, बडक, कुशल देशमुख, राम गरुड, संदीप देशमुख, सुनील सुसुंदरे, वसीम, जगदीश निकम, अजय खोमणे, देवरे सुरेश, राहुल सुरडकर, श्रीमती सुतार, लोलपाड एस., गणेश काकडे, श्रीमती बागवान, प्रा. नितीन ढोरमारे यांच्यासह ज्ञानविकास विद्यालयाचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद आणि शालेय वाहनचालक-मालक यांनी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

परीक्षक मंडळ

रेगुलवार एस.बी., सरकटे एस.बी., व्यवहारे जी.बी. यांनी विविध प्रयोगांचे वैज्ञानिक पद्धतीने मूल्यमापन केले.

हे संपूर्ण विज्ञान प्रदर्शन विद्यार्थ्यांच्या विज्ञानावरील आवड, त्यांच्या नवोन्मेषी क्षमतेचे द्योतक ठरले. वैज्ञानिक दृष्टीकोन वाढविणारा आणि शिक्षणाला दिशा देणारा हा उपक्रम यंदाही उत्साहात पार पडला.

## संक्षिप्त

## कष्टाच्या वाटा ला तातोबा पोवार बालसाहित्य पुरस्कार

**आत्ताच एक्सप्रेस**
**पैठण प्रतिनिधी/ हारुन शेख/** शूकोल्हापूर जिल्ह्यातील गारगोटी येथील वीणापाणि फाऊंडेशनच्या वतीने २०२३-२४ यावर्षातील अतिशय दर्जेदार व आशयघन प्रतिभासंपन्न बालसाहित्य असलेल्या कष्टाच्या वाटा ला तातोबा ड. पोवारस्मृती बालसाहित्य पुरस्कार यंदा मराठवाड्याचे प्रसिध्द बालकवी तथा बालभारतीच्या


वीणापाणि फाऊंडेशन
गारगोटी, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर
तातोबा ड. पोवार स्मृती पुरस्कार - 2023
॥ सन्मानपत्र ॥
मा.अय्युब लोहगावकर
'वीणापाणि' मार्फत सन्मानाने बहाल करण्यात आलेला 2023 सालातील राज्यस्तरीय उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार हा आपल्या 'कष्टाच्या वाटा' या बालसाहित्यास बहाल करताना आम्हास मनस्वी आनंद होत आहे. आपले साहित्यिक योगदान असेच अविरतपणे सुरु ठेवून उत्तरोत्तर दर्जेदार आणि प्रतिभासंपन्न साहित्य निर्मिती होत राहो यासाठी आपणांस खूप खूप शुभेच्छा..!
श्री. ए. वाय. इंदुलकर
उपाध्यक्ष
सौ. आर. बी. जठार
अध्यक्ष

पाठयपुस्तकातील कवी अय्युब पठाण लोहगावकर यांना मिळाला आहे. असे वीणापाणि फाऊंडेशनच्या अध्यक्षा सौ. आर. बी. जठार आणि उपाध्यक्ष श्री. ए. वाय. इंदुलकर तसेच जठार क्लासेसचे संस्थापक श्री. बा. स. जठार यांनी मोबाईलद्वारे अय्युब पठाण यांना कळविले आहे. या पुस्काराचे स्वरूप रोख अकराशे रूपये हे गुगल पेवर पाठवून दिले असून सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह पोस्टाने पाठविले आहे. हा सन्मानाचा पुरस्कार मिळाल्याने अय्युब पठाण लोहगांवकर यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

## कुंडलिकराव पवार यांचे निधन



**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी** / येथील रामनगर पोलिस कॉलनीतील रहिवासी कुंडलिकराव रामभाऊ पवार (वय ८८ वर्षे) यांचे बुधवार दि. २६ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, मुलगी, सुना असा मोठा परिवार आहे. परशुराम पवार यांचे ते वडिल होत.

### दिव्यांग व्यक्तींना सन्मानाने आयुष्य जगण्यासाठी शासनाचे सर्वतोपरी प्रयत्न

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने १ लाख दिव्यांगांना कृत्रिम अवयव वितरण

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई प्रतिनिधी**/राज्यात दिव्यांग व्यक्तींना सन्मानाने आयुष्य जगण्यासाठी सर्व सुविधा मिळवून देण्याकरिता शासनाचे सर्वतोपरी प्रयत्न आहेत. समाजातील सर्व घटकांना समान संधी उपलब्ध करून देण्याचे शासनाचे ध्येय आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने व रतननिधी फाऊंडेशनतर्फे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी मोफत कृत्रिम अवयव व सहाय्यक साधन वितरण शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. या उपक्रमाद्वारे १ लाख दिव्यांग व्यक्तींना लाभ देण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले असून, हा अभिनव प्रकल्प दिव्यांग पुनर्वसनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील असून, स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने त्यासाठी अधिक प्रभावी कार्यवाही केली जात आहे . या उपक्रमाचा उद्देश दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी बनवणे, त्यांचा आत्मविश्वास वाढवणे, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करणे हा आहे.

कृत्रिम हात, पाय, श्रवणयंत्रे, व्हीलचेअर्स आणि इतर सहाय्यक उपकरणे यांचा समावेश असलेला हा वितरण कार्यक्रम राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये टप्प्याटप्प्याने राबविण्यात येत आहे. रतननिधी फाऊंडेशनने राज्यातील बीड, चंद्रपूर, जळगाव, सोलापूर, पालघर, मुंबई, गडचिरोली, पुणे, सातारा, कोल्हापूर, रायगड, लातूर, नांदेड, यवतमाळ, अकोला, परभणी, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव आणि ठाणे या जिल्ह्यांमध्ये २९,४९६ सहाय्यक साधनांचे (जयपूर फूट, पोलिओ कॅलिपर्स, कृत्रिम हात व काठी) वितरण करून सुमारे २६ हजार दिव्यांग व्यक्तींचे पुनर्वसन केले आहे.

जागतिक स्तरावर सुमारे १५ टक्के लोकसंख्या दिव्यांग आहे, तर भारतात हा आकडा सुमारे २.२ टक्के आहे. या पार्श्वभूमीवर रतननिधी फाऊंडेशनचा मोबिलिटी प्रकल्प दिव्यांग व्यक्तींना सन्मानाने आयुष्य जगण्याची उर्मी देणारा, आत्मविश्वास मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे.

## अंतरवाला येथील शिवसेना -राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचा भाजपात जाहीर प्रवेश

**आत्ताच एक्सप्रेस**
**घनसावंगी प्रतिनिधी**/ घनसावंगी तालुक्यातील अंतरवाला बुद्रुक येथील शिवसेना शिंदे गटआणि राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर



प्रवेश केला. भाजपा नेते सतीश घाटगे पाटील यांच्या कार्याने प्रभावित होऊन त्यांनी भाजपात प्रवेश केला. यावेळी प्रभाकर धांडे, बाबासाहेब हरबक, लक्ष्मण काटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

अंतरवाला बुद्रुक येथील सुरेश माकोडे , शैलेश तांगडे, रामा तांगडे, आतिक शेख, अझर सय्यद, दीपक माकोडे, माऊली माकोडे, गोपाल माकोडे, गोविंदा माकोडे, गौतम घोगरे, दत्ता खामकर, कैलास माकोडे, पंढरी टोम्पे, अमोल घोगरे , मनोहर टोम्पे , अमोल घोगरे, अशोक टोम्पे, शरद टोम्पे , मनोहर जाधव, अशोक काळे यांच्यासह आदीनी सतीश घाटगे यांच्या हस्ते भाजपात प्रवेश केला. सर्वांचे सतीश घाटगे यांनी पक्षात स्वागत करून वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या पक्ष प्रवेशामुळे अंतरवाला बुद्रुक येथे पक्षाची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत झाली आहे.

## जालन्याचे युवा शाहीर रामानंद उगले यांना महाराष्ट्र शासनाचा युवा राज्य सांस्कृतिक पुरस्कार

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी** / राज्य सांस्कृतिक कार्य विभागामार्फत देण्यात येणाऱ्या २०२४-२५ वर्षातील राज्य सांस्कृतिक पुरस्कारांची घोषणा आज सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांनी केली. कलेच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कलावंतांचा सन्मान करण्यात येणार असून यंदाच्या घोषणेत विधीनाट्य या कलावर्गातील युवा राज्य सांस्कृतिक पुरस्कार जालन्याचे युवा शाहीर रामानंद उगले यांना जाहीर झाला आहे.



पुरस्कारामध्ये एक लाख रुपये, मानचिन्ह, सन्मानपत्र आणि शाल यांचा समावेश असून लवकरच मुंबईत होणाऱ्या समारंभात हा सन्मान प्रदान केला जाणार आहे.

युवा शाहीर रामानंद उगले हे गोंधळी परंपरेचा अनेक पिढ्यांचा वारसा जपत आहेत. ते आणि त्यांचे बंधू - गीतकार कल्याण उगले व विशाल उगले - एकत्रितपणे आपली ही समृद्ध परंपरा पुढे नेत आहेत. त्यांनी आपल्या प्रभावी सादरीकरणातून महाराष्ट्राच्या विविध लोककलांचा आदरयुक्त परिचय रसिकांपुढे सातत्याने घडवला आहे. महाराष्ट्राची लोककला सामान्य लोकांपर्यंत पोहोचावी या उदात्त हेतूने, शाहीर रामानंद आणि कल्याण उगले यांच्या संकल्पनेतून 'महाराष्ट्राची लोक गाणी' या पहिल्या लोकसंगीत वेब सिरीजची निर्मिती केली. यातून विविध लोककला घरघरी पोहोचवून प्रेक्षकांना आनंद आणि जाणीव व्हावी लोककलेचा व्यापक प्रसार व्हावा या उद्देशाने कार्य करत आहे. लोककलेसोबतच, शाहीर रामानंद यांनी मराठी चित्रपटसृष्टीत पार्श्वगायक म्हणूनही आपले नाव लौकिक केले आहे. त्यांनी आजपर्यंत सुप्रसिद्ध संगीतकार अजय-अतुल, अमित राज, अवधूत गुप्ते, हितेश मोडक ,मनोहर गोलांबरे ,कमलेश भडकमकर यांच्यासह अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. त्यांच्या याच बहुमोल योगदानामुळेच राज्य शासनाने त्यांना या पुरस्काराने सन्मानित केले आहे.

युवा राज्य सांस्कृतिक पुरस्कार जाहीर झाल्यानंतर, शाहीर रामानंद उगले यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले हा सन्मान केवळ माझा नसून, माझ्या संपूर्ण गोंधळी परंपरेचा, गुरु परंपरेचा आणि माझ्यासारख्या सर्व युवा कलावंतांचा आहे, असे मी मानतो. या सन्मानामुळे माझ्यावर लोककला संवर्धनाची आणि परंपरेची जबाबदारी अधिक वाढली आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे.

या निमित्ताने मी माझ्या महाराष्ट्रातील सर्व लोककलाकारांचे मनपूर्वक आभार व्यक्त करतो, कारण त्यांच्या कलेचा आदर ठेवून, त्यांची कला आत्मसात करून मी माझी कला सादर करत असतो. या बहुमानाबद्दल मी राज्य सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेही मनःपूर्वक आभार मानतो.

शाहीर रामानंद उगले यांच्या कला साधनेत गुरुवर्य पांडुरंग घोटकर, शाहीर सम्राट देवानंद माळी, शाहीर अप्पासाहेब उगले, शाहीर अंबादास तावरे, कृष्णा मुसळे आणि प्रा.गणेश चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाचा मोठा वाटा आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे रामानंद यांच्या कलाविष्काराला अभ्यासपूर्ण आणि प्रभावी स्वरूप लाभले आहे.

पुरस्काराची घोषणा होताच जालना जिल्ह्यासह राज्यभरातील कलाकार, अभ्यासक आणि रसिकांकडून रामानंद उगले यांच्या कार्याचे कौतुक करण्यात येत आहे. गोंधळी परंपरेचा वारसा जपत आधुनिक माध्यमांतून लोककलाचा प्रसार करणाऱ्या युवा कलाकाराचा योग्य हा सन्मान आहे.

### शांतिनिकेतन नर्सिंग महाविद्यालयाचे घवघवीत यश!

## आपला पाल्य स्वतःच्या पायावर उभा राहिला यापेक्षा पालकांना दुसरा आनंद नसतो - भास्करराव अंबेकर

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी**/ महाराष्ट्र शासनाच्या वतीने नुकताच नर्सिंग महाविद्यालयातील परीक्षांचा निकाल घोषित केला. जालना शहरातील समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शांतिनिकेतन नर्सिंग महाविद्यालयानेही अत्यंत चांगले यश मिळवून संस्थेची उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली. नर्सिंगच्या प्रथम वर्षातील या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव संस्थेचे अध्यक्ष भास्करराव अंबेकर यांच्या हस्ते व माजी सभापती देवनाथ जाधव, माजी नगरसेवक बाला परदेशी, प्राचार्य विकास राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर मुख्याध्यापक ज्ञानेश्वर गाढवे, शिवहरी मांटे, गणेश लाहोटी यांचीही उपस्थिती होती. प्रथम वर्षाच्या या परीक्षेत साक्षी लिपने हिने ८९.२० टक्के घेऊन प्रथम, शाफिया शेख हिने ८७.६० टक्के गुण घेऊन द्वितीय तर अभिषेक रणमळे याने ८५ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. या सर्वांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. महाविद्यालयातील ९ विद्यार्थी विशेष प्राविण्य, २१ प्रथम श्रेणी तर ७ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना संस्थेचे अध्यक्ष भास्करराव अंबेकर म्हणाले की, संस्थेची यशाची परंपरा नर्सिंग महाविद्यालानेही कायम ठेवली राखली आहे. प्रथम वर्षाच्या परीक्षेला बसलेले सर्वच्या सर्व विद्यार्थी अत्यंत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन महाविद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागला त्याबद्दल त्यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे मन:पूर्वक अभिनंदन केले. नर्सिंगमध्ये विद्यार्थ्यांना चांगल्या



संधी असून विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करावा. संस्थेने नेहमीच दर्जेदार शिक्षणाला प्राधान्य दिले, दर्जेदार व चांगले शिक्षण मिळावे याकरिता आम्ही सातत्याने प्रयत्न करत असतो. आपणांस उपलब्ध करून दिलेल्या चांगल्या संधीचा लाभ घेऊन आपण उत्तम ज्ञानप्राप्ती करावी. पाल्याने स्वतःच्या पायावर उभे राहण्यासारखा पालकांना दुसरा आनंद नसतो.

आई वडील हे आपल्याकडे अत्यंत आशेने पहात असतात. त्यांचीही आपल्याकडून काही स्वप्न असतात त्यांना तडा जाता कामा नये. असे सांगून अंबेकर पुढे म्हणाले की, नर्सिंग क्षेत्रात अत्यंत चांगल्या संधी आहेत. स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी अत्यंत चांगला अभ्यास करून यशस्वी होणे गरजेचे आहे. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना विदेशातही काम करण्याची मोठी संधी आहे. कोविडच्या काळात देशात परिचारिकांनी अत्यंत कठोर परिश्रम घेऊन हजारो नागरिकांचे प्राण वाचविले. त्यामुळे आपला हा व्यवसाय अत्यंत महत्वाचा व नागरिकांच्या जीवन-मरणाशी संबंधित असल्याचे सांगून त्यांचे कौतुक केले. सर्व शिक्षकांनी अत्यंत मेहनत घेऊन आपल्या विद्यार्थ्यांना घडविले असल्याने त्यांचे मनपूर्वक अभिनंदन केले. तसेच नवीन विद्यार्थ्यांनीही जुन्या विद्यार्थ्यांचा आदर्श समोर ठेऊन कठोर अभ्यास करावा असे आवाहन केले. यावेळी शिक्षक विद्या भालेराव, लक्ष्मी वटाणे, पूनम गायकवाड, लिपिक विशाल वाघ, तुकाराम चव्हाण आदींची यावेळी उपस्थिती होती.

## सकलेचा नगरवासीयांची नागरी समस्यांपासून होणार मुक्तता, भास्कर आबा दानवे यांच्या पुढाकाराने कामांना सुरुवात...

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी**/ शहरातील सकलेचा नगर भागात उघडी गटारे, रस्त्यावर तुंबलेले पाणी, बंद पथदिवे अशा नागरिक समस्यांनी येथील रहिवाशांचे जगणे मुश्किल केले होते.

महानगरपालिका प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही कुठलीच दखल घेतली जात नसल्याने अखेर भारतीय जनता पार्टीचे महानगर जिल्हाध्यक्ष भास्करराव पाटील दानवे यांच्याकडे रहिवाशांनी कैफियत मांडली असता त्यांनी तातडीने यंत्रणा हालवून शनिवारी ( ता.२९) प्रत्यक्ष कामास सुरुवात केली.



संकलेचा नगर भागात गुत्तेदाराने नालीचे बांधकाम अर्धवट सोडून भुयारी गटाची जोडणी व्यवस्थित केली नव्हती.गटारावर ढापे न टाकता उघडे ठेवून पेवर ब्लॉक सुद्धा बसवले नाही ,परिणामी परिसरात रस्त्यावर तुंबलेल्या गटारीच्या पाण्यातून रहिवाशी, शालेय विद्यार्थ्यांना ये-जा करावी लागत होती.

बंद पथदिव्यांमुळे चोऱ्यांचे प्रमाणही वाढले होते. वर्षभरापासून मनपा प्रशासनाकडे पाठपुरावा करूनही दखल घेतली जात नसल्याने येथील रहिवाशी मेटा कुटीस आले.

दोन दिवसापूर्वी भास्करराव पाटील दानवे यांनी या भागात भेट देऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या.आज सकाळी यंत्रणेसह प्रत्यक्ष कामास सुरुवात केली.

त्याबद्दल रहिवाशांनी रमेशचंद्र अग्रवाल ( फरशीवाले ) यांच्या निवासस्थानी भास्करराव पाटील दानवे यांचा सत्कार केला.

यावेळी माजी नगरसेवक जीवन सले, सुनील राठी, धनराज काबलीये, रमेशचंद्र अग्रवाल ( फरशीवाले ) ,प्रवीण मोहता ,शांतीलाल सकलेचा ,अरुण अग्रवाल, द्वारकादास चेचानी ,कैलासचंद आगीवाल, पंकज गौड ,सौरभ सकलेचा ,नितीन अग्रवाल , आदेश कोटेचा ,प्रकाश आगीवाल, रामेश्वर मंत्री ,रोहित नलावडे ,चोरमारे यांच्यासह परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.



जालना शहर महानगरपालिकेतील रस्त्यावरील धूळ ओढण्याची मशीन धुळखात पडलेली दिसून येत आहे याकडे पालिकेने लक्ष देण्याची गरज.....

## पूरग्रस्त शेतकऱ्यांना बियाणे वाटपाचा कार्यक्रम संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**
**देगलूर- प्रतिनिधी** / नाम फाउंडेशन व बीएसएफ संस्थेअंतर्गत पूरग्रस्त शेतकऱ्यांना बियाणे वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला मानवी हक्क अभियान मराठवाडा अध्यक्ष डॉक्टर मच्छिंद्र गवाले यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले त्यामध्ये पूरग्रस्त भागातील शेतकऱ्यांना शेतकरी महिलांना बियाणे वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला त्यासोबतच क्रिसील फाउंडेशनच्या रिझर्व बँक ऑफ इंडिया अंतर्गत चालणारा प्रकल्पाद्वारे देगलूर तालुका समन्वयक संगीता वाघमारे यांनी गावातील महिलांना आर्थिक साक्षरता याविषयी माहिती दिले विमा पेन्शन सुकन्या योजना प्रधानमंत्री सुरक्षा विमा, प्रधासनमंत्री जीवन ज्योती विमा, अटल पेन्शन, डिजिटल व्यवहार, नामांकन व रिकेवायसी तसेच बचत गुंतवणूक, आर डी एफ डी, आणि पीपीएफ योजना याविषयी सविस्तर माहिती दिली ..




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813